🔰 *तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर मार्फत कोल्हापूर केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा संपन्न...* 🔰

➡️ *फार्मासिस्टचे कार्य नेहमीच कौतुकास्पद - डॉ. विनय कोरे (सावकर)...*

*फार्मासिस्ट आपल्या सेवेच्या माध्यमातून कायमच समाजाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत असतात. विषेशतः कोरोना महामारीच्या काळात औषध वितरण यंत्रणेवर असलेला ताण पाहता कोल्हापूर केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या माध्यमातून झालेले कार्य निश्चितच कौतुकास्पद असून योग्य वेळी औषधांची उपलब्धता झाल्यामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचल्याचे प्रतिपादन वारणा विविध उद्योग व शिक्षण समुहाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे (सावकर) यांनी केले...*

*वारणा सायन्स अँड इनोवेशन ॲक्टिव्हिटी सेंटर आणि मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या 'शनिवारी विज्ञानवारी' उपक्रमांतर्गत ग्रामीण, दुर्गम भागातील शाळांमध्ये विज्ञान प्रसाराचे काम करणाऱ्या विज्ञानदुतांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला...*

*कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा यांनी केले. समाज आणि राष्ट्राला अपेक्षित सक्षम औषधतज्ञ निर्माण करण्यासाठी फार्मासिस्ट व्यावसायिक संघटना यांना एकत्र येवून काम करण्याची गरज असल्याचं मत त्यांनी या दरम्यान व्यक्त केलं.*

*महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेचे अध्यक्ष विजय पाटील, महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय संघटनेचे संघटन सचिव मदन पाटील, रवींद्र पाटील, नवनिर्वाचित अध्यक्ष शिवाजी ढेंगे यांची भाषणे झाली. औषध व्यावसायिकांच्या भल्यासाठी भविष्यातही कोरे का ॅलेज ऑफ फार्मेसी सोबत एकत्रित उपक्रम राबवणार असल्याचं विजय पाटील यांनी नमूद केलं.*

*यावेळी के.डी.सी.ए.चे नवनिर्वाचित पदाधिकारी शिवाजी ढेंगे, प्रल्हाद खवरे, भरतेश कळंत्रे, सचिन पुरोहित, भुजंगराव भांडवले, संदीप मिसाळ यांचा सत्कार करण्यात आला...*

*श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. सौ. वासंती रासम यांनी स्वागत केले. प्रा. सौ सुप्रिया गायकवाड यांनी सूत्रसंचलन केले. कार्यक्रमास जनसुराज्य शक्ती पक्षाचे प्रवक्ते ॲड. राजेंद्र पाटील, दादासो बच्चे, शाहुवाडी पन्हाळ्यातील फार्मासिस्ट, विज्ञानदुत उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले...*


श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ संचलित
तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर
आयोजित
कोल्हापूर डिस्ट्रीक्ट केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन
नवनिर्वाचित कार्यकारणी
(पदाधिकारी)
"सत्कार सोहळा-२०२१"


श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ संचलित
तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर
आयोजित
कोल्हापूर डिस्ट्रीक्ट केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन
नवनिर्वाचित कार्यकारणी
(पदाधिकारी)